# प्रेसनोट

दिनांक - 07/12/2023

## हजारो कोटी अपहार झालेल्या समृद्धी जीवन घोटाळयातील 07 वर्षापासुन फरार आरोपी सीआयडी कडुन जेरबंद

---

डेक्कन पोलीस ठाणे, पुणे शहर गु.र.नं. 243/2016 भा.द.वि.कलम 403, 406, 409, 120 (ब), 34 आणि महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंरक्षण अधिनियम सन -1999 चे कलम -3 मधील समृध्द जीवन समूहाचा सर्वेसर्वा गुन्ह्यातील मुख्य आरोपी महेश मोतेवार व आरोपी रामलिंग हिंगे यांनी संगनमत करुन महाराष्ट्र व संपुर्ण देशभरात समृध्द जीवन फुड्स इंडिया लिमीटेड व समृध्द जीवन मल्टी स्टेट मल्टी पर्पज को.ऑप सोसायटी यांच्या अनेक शाखा उघडुन त्यांच्या माध्यमातुन गुंतवणूकदारांची 4725 कोटीहून अधिक रकमेचा अपहार केला होता. आरोपी रामलिंग हिंगे वय- 56 रा. गल्ली नं-3, गोकुळनगर, कात्रज, पुणे हा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार होता, सदर आरोपी मागील 07 वर्षापासुन पुण्यात वेगवेगळ्या ठिकाणी ओळख लपवुन राहत असल्याने मिळुन येत नव्हता. सदर आरोपी दिनांक 06/12/2023 रोजी सिटीप्राईड सिनेमागृह, सातारा रोड, पुणे याठिकाणी येणार असलेबाबत गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली. त्या अनुषंगाने सापळा रचुन, आरोपीचा मागोवा घेवुन आरोपीस सिटीप्राईड सिनेमागृह, सातारा रोड, पुणे या ठिकाणावरुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

समृध्द जीवन समूहाविरूध्द भारतभरात एकूण 26 गुन्हे दाखल आहेत. समृध्द जीवन समूहाद्वारे संपूर्ण भारतभरातील 64 लाखांपेक्षा अधीक गुंतवणूकदारांची व महाराष्ट्रातील एकूण 18 लाख गुंतवणूकदारांची फसवणुक करण्यात आली होती. सदर गुन्ह्यातील एकूण 25 आरोपींपैकी 16 आरोपीतांस अटक करण्यात आले असून त्यांचेविरूध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

सदर कामगिरी ही मा. श्री. प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि.म.राज्य.पुणे, यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली तसेच मा. संजय येनपूरे, विशेष पोलीस महानिरीक्षक गु.अ.वि.म.राज्य.पुणे, मा. श्रीमती. मनिषा दुबुले, पोलीस अधीक्षक,आ.गु.शा., गु.अ.वि.म.राज्य.पुणे, मा. श्रीमती. तृप्ती जाधव, अपर पोलीस अधीक्षक, संगणक, गु.अ.वि.म.राज्य.पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. आनंद रावडे, पो.हवा. सुनिल बनसोडे, पो.हवा. प्रदिप चव्हाण, पो.हवा. कोळी सर्व नेमणुक गु.अ.वि.म.राज्य.पुणे यांनी केलेली आहे.

Addl. Director General of Police * C.I.D. (Crime) M.S. Pune *

(तृप्ती जाधव)
अपर पोलीस अधीक्षक, संगणक
अति/कार्य. पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा.
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे